# पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

डॉ. एस. डी. चव्हाण
विभाग प्रमुख

दूरध्वनी क्र. ०७२४-२२५६००१
ई-मेल :hdahdspdkv@gmail.com

जा.क्र.वि.प्र./पसदुशा/वाहतूक/दरपत्रक/ ४४४ /२०२४ दिनांक : ०३/०९/२०२४

**दरपत्रक सुचना**

**विषय :** पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., येथे मुरघास करणेकरिता कंत्राटी पद्धतीने **'प्रक्षेत्रावरील ज्वार/मका पिकाच्या कापणी'**चे दर पुरविणेबाबत बंद पाकीटात दरपत्रक मागविणेबाबत ... ...

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे मुरघास करणेकरिता प्रक्षेत्रावर सन २०२४-२५ मधील खरीप हंगामातील ज्वार/मका पिकाची कापणी करणे, बांधणी करणे, व्यवस्थित रचून ट्रोली मध्ये भरणे व विभागावर सदर ट्रोली खाली करणे ई. कामे कंत्राटी पद्धतीने करणेकरिता शहरालगत व शहरालगतच्या खेडे गावातून बंद पाकीटात दरपत्रक मागविन्यात येत असून सदर पिकाच्या कापणीचे दर पुरविणेकरीता दरपत्रक सोबत जोडले आहे.

१. प्रक्षेत्रावरील ज्वार पिकाची कापणी, बांधणी, ट्रोली मध्ये भरणे व खाली करणे या सर्व कामाचे एकत्रित दर (प्रति एकर) सोबत जोडलेल्या दरपत्रकामधे भरून दरपत्रक सादर करावे. ज्वारी/मका कापणीचे क्षेत्र अंदाजे ३५ ते ४० एकर राहील.
२. सदर दरपत्रक **विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** यांचे नावे सादर करावे व लिफाफ्यावर ***'प्रक्षेत्रावरील ज्वार/मका कापणीचे दर पुरविनेबाबत चे दरपत्रक'*** असा स्पष्ट उल्लेख करावा.
३. विहित नमुन्यातील दरपत्रक कार्यालयीन वेळत स. १०.३० ते सा. ५.३० वाजेपर्यंत बंद पाकीटातच स्वीकारण्यात येतील.
४. दरपत्रक सादर करण्याची **अंतिम तारीख दि. १३.०९.२०२४** असून त्याच दिवशी सा. ५.३० वाजता मा. विभाग प्रमुख यांच्या कार्यालयात मंजूर समितीसमक्ष उघडण्यात येतील.
५. नमूद केलेले ज्वार/मका कापणीचे दर हे दरपत्रक मंजूर झाल्यापासून पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता ग्राह्य राहतील.
६. मुरघास हा विहित वेळेत पूर्ण करणे गरजेचे असल्यामुळे मुरघास सुरु असतांना हिरवा चा-याच्या पुरवठ्यामध्ये खंड पडणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. कामे आखून दिलेल्या वेळेतच पूर्ण करावी लागतील.
७. ज्वार/मका पिकाची कापणी, बांधणी, ट्रोली मध्ये भरणे व खाली करणे या सर्व कामासाठी लागणारे मजूर हे एकाच वेळी पुरवावे लागतील.
८. सदर कामाकरिता लागणारे साहीत्य हे कंत्राटदाराचे राहील. या कार्यालयातून कोणतेही साहित्य पुरविल्या जाणार नाही.
९. कंत्राटदाराने देण्यात आलेल्या कामास किंवा पुरवठा करण्यास दिरंगाई केल्यास किंवा सांगितलेल्या कामे वेळेत पूर्ण न केल्यास कामाचे आदेश रद्द करण्याचा अधिकार विभाग प्रमुखास राहतील.
१०. कापणी व बांधणी केलेल्या पिकाची वाहतूक करणेकरिता विभागातील ट्रक्टर व ट्रोली पुरविण्यात येईल.
११. कार्यालयात केलेल्या कामाचे कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.
१२. ज्वारी/मका कापणीकरिता काम करणा-या मंजुरांची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदराचीच राहील. मजुरांच्या कोणत्याही प्रकारच्या होणा-या हाणीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
१३. कंत्राटदारामार्फत ज्वारी/मका कापणीच्या झालेल्या कामाची प्रक्षेत्रावरील अधिका-यामार्फत शहानिशा करुन व कार्यालयीन प्रकियेनंतरच देयके काढण्यात येतील.
१४. दरपत्रक विहित नमुन्यात नसल्यास दरपत्रक नामंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना राहतील.
१५. दरपत्रकाततील अधिक माहितीकरीता विभाग प्रमुख, पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

विभाग प्रमुख
पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# दरपत्रक

**(FORM OF QUOTATION)**

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे मुरघास करणेकरिता प्रक्षेत्रावर सन २०२४-२५ मधील खरीप हंगामातील ज्वार/मका पिकाची कापणी करणे, बांधणी करणे, व्यवस्थित रचून ट्रोली मध्ये भरणे व विभागावर सदर ट्रोली खाली करणे ई. कामे कंत्राटी पद्धतीने करणेकरिता **'प्रक्षेत्रावरील ज्वार/मका पिकाच्या कापणी'** चे दर पुरविणेबाबतचे दरपत्रक.

| अ. क्र. | कामाचे विवरण | दर प्रति एकर (रुपये) |
|---|---|---|
| 1. | प्रक्षेत्रावरील ज्वारी/मका पिकाची कापणी करणे, बांधणी करणे, व्यवस्थित रचून ट्रोली मध्ये भरणे व विभागावर मुरघास खड्याजवळ सदर ट्रोली खाली करणे ई. कामे कंत्राटी पद्धतीने करणे | |

निविदेमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक :

सही व शिक्का